सत्यमेव जयते

Government of Maharashtra
Forest Department

E-Mail- dahanudcf@gmail.com **Deputy Conservator of Forests, Dahanu Forest Division,Dahanu.**
dycfdahanu@mahaforest.gov.in Dahanu Agar Road, Near Panchayat Samiti, Dahanu, Tal- Dahanu, Dist-Palghar, Pin 401601

---

**पत्र** जा.क्र.अ/20/जमिन/ 358 /सन 2023-24, डहाणू 401 601, दिनांक 13 /06/2023.

प्रति,

मा. मुख्य वनसंरक्षक (प्रा.),
ठाणे.

विषय :-1. तारापूर-बोरीवली आणि बोईसर-घोडबंदर ट्रान्समिशन लाईनच्या कामासाठी 10.3391 हे. वनजमीन वळती करणेबाबत..
2. 132 KV. D/C बोईसर डहाणू (MIDC) ट्रान्समिशन लाईनच्या LILO (Line in Line Out) कामासाठी पालघर येथील 20.5983 हे. वनजमीन वळती करणेबाबत..

संदर्भ:-1. मा. अवर सचिव, महाराष्ट्र शासन, यांचेकडील पत्र क्र.एफएलडी-1223/ प्र.क्र.63/फ-10, दिनांक 14.03.2022.
2. या कार्यालयाकडील पत्र जा.क्र.अ/20/जमिन/73, दिनांक 17.04.2023.
3. उप वनसंरक्षक, जव्हार यांचेकडील पत्र जा.क्र.ब/20/जमिन/121, दि.18.04.2023.
4. या कार्यालयाकडील पत्र जा.क्र.अ/20/जमिन/218, दिनांक 18.04.2023.
5. आपले कार्यालयाकडील पत्र जा.क्र.कक्ष-10/वसं/प्र.क्र.36/22-23/115, दिनांक 22.05.2023.
6. आपले कार्यालयाकडील पत्र जा.क्र.कक्ष-10/वसं/प्र.क्र.36/22-23/ 114, दिनांक 23.05.2023.
7. उप वनसंरक्षक, नांदेड वनविभाग, नांदेड यांचेकडील पत्र क्र.अ/नांववि/जमीन/105, दिनांक 20.04.2023. ( दि.12.06.2023 रोजी ई-मेलव्दारे प्राप्त)

विषयांकित प्रस्तावासंदर्भात संदर्भीय क्रमांक 1 अन्वये उपस्थित झालेल्या त्रुटींबाबतचा पुर्तता अहवाल संकलित करुन सादर करणेबाबत संदर्भीय पत्र क्रमांक 5 व 6 अन्वये कळविल्याने खालील प्रमाणे सुधारीत पुर्तता अहवाल सादर करणेत येत आहे.

| अ. क्र. | प्रकल्पाचे नांव | उपस्थित केलेले आक्षेप | पुर्तता अहवाल. | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | गाव/सर्व्हे नं./गट नंबर | वनाचा प्रकार | खुलासा अहवाल |
| 1 | तारापूर-बोरीवली आणि बोईसर-घोडबंदर ट्रान्समिशन लाईनच्या कामासाठी 10.3391 हे. | 1. काही 7/12 उताऱ्यावर खाजगी व्यक्तींची नावे असून कूळ कायद्याने प्राप्त जमीन, महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, 1966 कलम 36 व 36अ अंतर्गत हस्तांतरणास | मौजे-कोंढले, गट नं. 203 पै. | 35 सेक्शन (मानीव राखीव वनाचे क्षेत्र) | मौजे-कोंढले येथील पूर्वीचे इनाम गावाचे 1425 एकर अनसर्व्हेड क्षेत्रास नोटीस क्रमांक WT/8A, दि.31/05/1956 नुसार भारतीय वन अधिनियम 1927 चे कलम 35(3) नुसार नोटीस लागलेली आहे. (सोबत छायांकित प्रत सादर करणेत येत आहे.) सदर खाजगी वनाच्या तरतूदी लागू असलेले 1425 एकर क्षेत्राची निश्चिती आजमितीस झालेली नसल्या कारणाने महसूली अभिलेखा (7/12) सदरी |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | वनजमीन वळती करणेबाबत.. | बंदी, नवीन अविभाज्य शर्तीवर, आदिवासी खातेदार असे शेरे आहेत. | | | खाजगी वनासंबंधीच्या नोंदी घेतलेल्या नसून, मौजे-कोंढले येथील 7/12 उताऱ्यांवर पुर्वापार हक्क असलेल्या संबंधित खातेदारांचे भोगवटदार सदरी नावे नोंद आहेत. मात्र सदर क्षेत्र हे उपरोक्त नमुद चतु:सिमेमध्ये येत असल्याने, तसेच सदर क्षेत्रास भारतीय वन अधिनियम, 1975 मधील तदतूदीनुसार मानीव राखीव वन या दर्जाचे असल्याने सदर क्षेत्रामध्ये वनेत्तर कामे करणेकरीता केंद्र शासनाची मंजूरी आवश्यक आहे. तरी सदर क्षेत्र प्रस्तावामध्ये अंतर्भूत करणेत येऊन त्याअनुषंगाने 7/12 उतारे प्रस्तावासोबत सादर करणेत आलेले आहेत. |
| | | | लोहपे, गट नं- 83/10 | संरक्षित वन | मौजे-लोहपे, स.नं.83/10, केळठण, स.नं.173 व 176, गोराड, स.नं.61 व 62, निंबवली,स.नं. 55/1 चे क्षेत्र हे वनविभागाकडील फॉर्म नं.1 नुसार संरक्षित वनाचे क्षेत्र असून सदर सर्व्हे क्रमांकाचे क्षेत्र The Bombay Government Gazette No.1555(c), Date- 02 March 1905 अन्वये संरक्षित वन घोषित झालेले आहे. (शासन अधिसुचनेची प्रत यासोबत जोडली आहे.) त्याअनुषंगाने सदर क्षेत्रामध्ये वनेत्तर कामे करणेकरीता वन (संवर्धन) अधिनियम, 1980 चे कलम 2 नुसार केंद्र शासनाची परवानगी आवश्यक असल्याने, सदर क्षेत्र प्रस्तावामध्ये अंतर्भूत करणेत येऊन, सद्यस्थितीचे 7/12 उतारे प्रस्तावासोबत सादर करणेत आलेले आहे. तथापि सदर क्षेत्राचे 7/12 सदरी घेणेत आलेल्या नोंदी हया महसूल विभागाकडून कोणत्या आधारे घेण्यांत आलेल्या आहेत. याबाबतचा दस्तऐवज या कार्यालयातील अभिलेखामध्ये उपलब्ध नाही. |
| | | | लोहपे, गट नं-52, 10 | वनसंज्ञा | |
| | | | केळठण, 176 (गट नं-154, 155) | संरक्षित वन | |
| | | | केळठण, 173 (गट नं-507, 512, 513, 514, 515) | संरक्षित वन | |
| | | | गोराड, 61 (गट नं.161, 131) | संरक्षित वन | |
| | | | निंबवली, 55/1 (गट नं.325) | संरक्षित वन | |
| | | | मौजे-कळंभोण, स.नं. 68W1, 68/4A, 68/W2, W9 | संरक्षित वन | मौजे-कळंभोण, स.नं.68, 102, नवसई (जुने गांव भाताणे) , स.नं. 162, 400, खानिवडे, सं.नं.142 चे क्षेत्र हे वनविभागाकडील फॉर्म नं.1 नुसार संरक्षित वनाचे क्षेत्र असून सदर सर्व्हे क्रमांकाचे क्षेत्र शासन अधिसूचना क्रमांक No.4F Dated 1 March 1879 अन्वये संरक्षित वन घोषित झालेले आहे. (शासन अधिसुचनेची प्रत यासोबत जोडली आहे.) त्याअनुषंगाने सदर क्षेत्रामध्ये वनेत्तर कामे करणेकरीता वन (संवर्धन) अधिनियम, 1980 चे कलम 2 नुसार केंद्र शासनाची परवानगी आवश्यक असल्याने, सदर क्षेत्र प्रस्तावामध्ये अंतर्भूत करणेत येऊन, सद्यस्थितीचे 7/12 उतारे प्रस्तावासोबत सादर करणेत आलेले आहे. तथापि सदर क्षेत्राचे 7/12 सदरी घेणेत |
| | | | मौजे-कळंभोण, स.नं. 102A | संरक्षित वन | |
| | | | मौजे-नवसई162 (गट नं.74/1), | संरक्षित वन | |
| | | | मौजे-नवसई स.नं. 400 | संरक्षित वन | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | (गट नं. 10/1) | | आलेल्या नोंदी ह्या महसूल विभागाकडून कोणत्या आधारे घेण्यांत आलेल्या आहेत. याबाबतचा दस्तऐवज या कार्यालयातील अभिलेखामध्ये उपलब्ध नाही. |
| | | | मौजे-खानिवडे, गट नं. 142A | संरक्षित वन | |
| | | 2. पर्यायी वनीकरणासाठी प्रस्तावित केलेल्या जमिनीच्या गा.न.नं.7/12 मध्ये पूर्णपणे खाजगी व्यक्तींची नावे नोंदविलेली आहेत. सदर जमिनीत कापूस, सोयाबीन, तूर या पिकांची लागवड करण्यांत येत असल्याचेही दिसून येते. उपवनसंरक्षक, नांदेड यांनी मात्र सदर जमीन राखीव वन असल्याचे नमुद करुन पर्यायी वनीकरणासाठी प्रस्तावित केली आहे. सदर जमीन राखीव वनजमीन असल्यास अधिकार अभिलेखात खाजगी व्यक्तींची नावे कशाच्या आधारे आली आहेत, सदर खाजगी व्यक्ती अतिक्रमणधारक आहेत का? त्यांना 1980 पूर्वी जिल्हाधिकाऱ्याकडून जमीन वाटप झाली आहे का? असल्यास, आता तीजमीन पर्यायी वनीकरणासाठी वन विभागाकडे हस्तांतरीत करण्यास ते तयार आहेत का? | मौजे-डोरली, स.नं./गट नं.-47पार्ट/36 (कं.नं.404) | राखीव वन | तारापूर-बोरीवली आणि बोईसर-घोडबंदर ट्रान्समिशन लाईनच्या कामासाठी 10.3391 हे. वनजमीन वळतीकरणे बाबतच्या प्रकल्पामध्ये मौजे-डोरली, ता-भोकर, जि-नांदेड येथे नांदेड वन विभागाचे फॉर्म नं.1 नूसार 156.722 हेक्टर क्षेत्र आहे, मौजे-डोरली, ता-भोकर, जि-नांदेड येथील सर्व्हे नं.47 व गट नं.36 व वनकक्ष क्र.404 मध्ये 21.00 हेक्टर क्षेत्र पर्यायी वनीकरणासाठी प्रस्तावित करण्यांत आलेले असून 7/12 अभिलेख्यावर खाजगी व्यक्तीचे नांवे नसून 7/12 अभिलेख्यावर सरकार असे नमुद आहे. सुलभ संदर्भाकरीता 7/12 अभिलेखाची छायांकित प्रत यासोबत सादर करण्यांत येत आहे. तसेच सदरचे क्षेत्र हे आजघडीला उप वनसंरक्षक, नांदेड यांचे ताब्यात आहे. या वन विभागाचे फॉर्म नं.1 ला तशी नोद आहे. व त्या क्षेत्राचा दर्जा हा राखीव वन आहे. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 2 | 132 K.V. D/C बोईसर डहाणू (MIDC) ट्रान्समिशन लाईनच्या LILO (Line in line out) कामासाठी पालघर येथील 20.5983 हे. वनजमीन वळती करणेबाबत.. | 1. प्रस्तावित केलेले क्षेत्रापैकी मौजे-पाम, सर्व्हे नं. 200 व 201 येथील 7/12 उताऱ्यावर खाजगी व्यक्तींची नावे दिसून येत असल्यामुळे, सदर जमिन खाजगी मालकीचे कांदळवन असावे असे वाटते. तथापि, त्याबाबतची खात्री होणे आवश्यक आहे. | मौजे-पाम, सर्व्हे नं. 200 (32) व 201 (26) | कांदळवन | मौजे-पाम, सर्व्हे नं.200 (गट नं.32) चे क्षेत्र मा. उच्च न्यायालय, मुंबई यांचेकडील आदेश जनहीत याचिका क्र.87/2006 चे अनुषंगाने सदरचे क्षेत्र कांदळवन क्षेत्रापासून 50 मीटरच्या आत असल्याने MRSAC च्या नकाशावर कांदळवन क्षेत्र दर्शविणेत आलेले आहे. प्रस्तावित प्रकल्पामध्ये सर्व्हे नं.200 (गट नं.32) मधील 0.1971 हे. क्षेत्र सदर प्रकल्पांत प्रस्तावित केलेले आहे. त्यामुळे 7/12 उताऱ्यावरती खाजगी व्यक्तींची नांवे दिसून येत आहेत.<br>मौजे-पाम, सर्व्हे नं.201 (गट नं.26) चे क्षेत्र मा. उच्च न्यायालय, मुंबई यांचेकडील आदेश जनहीत याचिका क्र.87/2006 चे अनुषंगाने सदरचे क्षेत्र कांदळवन क्षेत्रापासून 50 मीटरच्या आत असल्याने MRSAC च्या नकाशावर कांदळवन क्षेत्र दर्शविणेत आलेले आहे. प्रस्तावित प्रकल्पामध्ये सर्व्हे नं.201 (गट नं.26) चे 0.1890 हे. क्षेत्र सदर प्रकल्पांत प्रस्तावित केलेले आहे. त्यामुळे 7/12 उताऱ्यावरती खाजगी व्यक्तींची नांवे दिसून येत आहेत. |
| | | 2. मौजे-आगवन, गट नं.एस-1 या क्षेत्राचा 7/12 अप्राप्त आहेत. सदर क्षेत्राचा 7/12 उपलब्ध करुन घेणे आवश्यक आहे. | मौजे-आगवन, एस-1 | कांदळवन | मौजे-आगवन, गट नं. S-1 चे क्षेत्र मा. उच्च न्यायालय, मुंबई यांचेकडील आदेश जनहीत याचिका क्र.87/2006 चे अनुषंगाने सदरचे क्षेत्र कांदळवन क्षेत्रापासून 50 मीटरच्या आत असल्याने MRSAC च्या नकाशावर कांदळवन क्षेत्र दर्शविणेत आलेले आहे. सदर क्षेत्राचा 7/12 उतारा उपलब्ध होत नाही. |
| | | 3. KML फाईलवरून पर्यायी वनीकरणासाठी प्रस्तावित केलेल्या मौजे-घोगरवाडी, रेंज किनवट येथील सनं./ गट नं.8, कंपा क्र.191 बी मधील जमीनीत कठीण दगड असावा. तेथे रोपांची वाढ होऊ शकेल का? त्यामुळे, सदर जमिन पर्यायी वनीकरणासाठी सुयोग्य आहे किंवा कसे, याबाबत खातरजमा करणे आवश्यक आहे. | मौजे-घोगरवाडी, सनं./ गट नं.8, (कंपा क्र.191 बी) | राखीव वन | मौजे-घोगरवाडी येथील सर्व्हे /गट नं.8 वन कक्ष क्रमांक 191 बी ही जागा 40 ते 50 टक्के खडकाळ असल्याने तेथे पर्यायी वनीकरणासाठी सदरचे क्षेत्र सुयोग्य नसल्याबाबत वनपरिक्षेत्र अधिकारी प्रा. किनवट व सहाय्यक वनसंरक्षक (जंकास व कॅम्पा), किनवट यांनी खातरजमा करुन अहवाल उप वनसंरक्षक, नांदेड यांचेकडे सादर केलेला आहे. तसेच मौजे-शिकारा येथील सर्व्हे नं.58 वनकक्ष क्रमांक 545 चे क्षेत्र 10.00 हे. कुरण विकास कार्यवर्तूळातील असल्याने त्याऐवजी आता शिराढोण येथील सर्व्हे नं.34 भाग गट नं.64 व वनकक्ष क्रमांक 572 ए/1 क्षेत्र 21.00 हेक्टर लागवडी करीता योग्य असल्याने सुधारीत अहवाल सादर केलेला आहे. त्याबाबत क्षेत्र लागवडीस योग्य असल्याबाबतचे प्रमाणपत्र व पर्यायी वनीकरण अंतर्गत अवनत वनक्षेत्रावर रोपवन कामाचे नमुना नं.5 नुसारचे |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | अंदाजपत्रक यासोबत जोडून सादर करण्यांत येत आहे. |
| | | 4. पर्यायी वनीकरणासाठी प्रस्तावित केलेल्या मौजे-मंगरुळ, जि-नांदेड स.नं./गट नं. 6, कंपा क्र.322 येथील क्षेत्रावर यापूर्वीच वनीकरण झालेले असल्याचे अथवा सदर जमिन वहिवाटीखाली असल्याचे दिसून येते. उप वनसंरक्षक, नांदेड यांनी मात्र सदर जमीन राखी वन असल्याचे नमुद करुन पर्यायी वनीकरणासाठी प्रस्तावित केली आहे. सदर जमिन पर्यायी वनीकरणासाठी योग्य/ अतिक्रमण मुक्त आहे किंवा कसे? याची खातरजमा करणे आवश्यक आहे. | मौजे-मंगरुळ, स.नं./गट नं. 6, (कंपा क्र.322) | राखीव वन | पर्यायी वनीकरणासाठी प्रस्तावित केलेल्या मौजे-मंगरुळ, जि-नांदेड विभागाचे फॉर्म नं.1 नुसार स.नं.6/गट नं.193 चे क्षेत्र 227.490 आहे. स.नं.6/गट नं.193 वनकक्ष क्र. 322 मध्ये प्रस्तावित केलेल्या 15.00 व 16.00 हेक्टर ठिकाणी यापूर्वी वनीकरण झालेले नाही. तसेच सदर जमीन ही आजघडीला वहिवाटीखाली नाही. सदर जमीनीची सहाय्यक वनसंरक्षक (तेंदू व कॅम्पा), नांदेड व वनपरिक्षेत्र अधिकारी हिमायतनगर यांनी दिनांक 30.03.2023 रोजी प्रत्यक्ष जायमोक्यावर जाऊन पुनश्चः खात्री केली असता, सदर जमीन पर्यायी वनीकरणासाठी योग्य व अतिक्रमण मुक्त आहे. |
| | | 5. त्याचप्रमाणे पर्यायी वनीकरणासाठी प्रस्तावित केलेल्या मौजे-मंगरुळ, जि-नांदेड, स.नं./गट नं.6 येथील जमिनीच्या 7/12 वर खाजगी व्यक्तीची नांवे दिसून येतात. प्रस्तावात मात्र सदरची जमिन वनजमिन म्हणून पर्यायी वनीकरणासाठी प्रस्तावित केली आहे. | | | सदर जमीनीचा दर्जा हा राखीव वन असून 7/12 अभिलेख्यावर 57.80 हेक्टर नोंद आहे. सदर क्षेत्र उप वनसंरक्षक, नांदेड वनविभागाच्या ताब्यात असून त्या जागेवर पर्यायी वनीकरण अंतर्गत अवनत वनक्षेत्रावर रोपवन कामे प्रस्तावित करण्यांत आलेले आहे. तसेच उर्वरित क्षेत्र हे. प्राप्त 7/12 अभिलेख्यानुसार महसूल विभागाकडून वाटप झालेले दिसून येत आहे. |
| | | 6. सदर जमिन वनजमीन असताना जमिनीच्या अधिकार अभिलेखात खाजगी | | | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | व्यक्तींची नावे कशाच्या आधारे आली आहेत, सदर वनजमिनीवर अतिक्रमण झाले आहे का? ती जमीन त्यांना जिल्हाधिकाऱ्यांकडून वाटप झाली आहे का? असल्यास, आता ती जमीन पर्यायी वनीकरणासाठी वन विभागाकडे हस्तांतरीत करण्यास ते तयार आहेत का? | | | |

(मधुमिथा एस.)
उप वनसंरक्षक
डहाणू वनविभाग, डहाणू.

प्रतिलिपी :- कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी लिमिटेड, अति उच्च दाब प्रकल्प विभाग, कल्याण 421 301 यांचेकडे माहिती व आवश्यकत्या कार्यवाहीस्तव अग्रेषित.